**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies**
Online ISSN 2278-8808, SJIF 2024 = 8.153
https://www.srjis.com/issues_data/234
Peer Reviewed & Refereed Journal, MAY-JUNE 2024, Vol- 13/83

# उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमधील नैतिक मूल्ये, व्यक्तिमत्व आणि शैक्षणिक संपादन यांमधील सहसंबंधाचा अभ्यास

**लांडे पुष्पा शिवराम**

संशोधक

**प्रा. डॉ. उपलाने मेधा**

*माजी, शिक्षणशास्त्र व विस्तार विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.*

**Paper Received On**: 20 May 2024
**Peer Reviewed On**: 24 June 2024
**Published On:** 01 July 2024

**Abstract**

*सर्व क्षेत्रातील ज्ञान हे अतिशय समृध्द व परिपूर्ण अवस्थेला पोहोचले आहे. त्यात अद्याप ही विविध प्रकारचे संशोधन चालू असून ते अधिकाधिक प्रगतावस्थेला पोहचण्यासाठी सर्व जगभर अखंड ज्ञानोपासना अविरतपणे चालू आहे.*

*भावनिक विकासासाठी खऱ्या अर्थाने पार्श्वभूमी तयार झाली तरच शिक्षणाला तसेच त्यातील ज्ञान आणि कौशल्यांना खरा अर्थ प्राप्त होत असतो. सामाजिक, राष्ट्राभिमान, देशभक्ती, विधायकता, चारित्र्य, सर्वधर्मसमभाव, दया, क्षमा शांती, समता, प्रेम, जिव्हाळा, विश्वास, प्रयत्नवाद, सामंजस्य, समाधान, प्रयत्न, सहकार्य, नैतिकता, आध्यात्मिकता इ. भावनिक विकासाची पर्यायाने व्यक्तिमत्व विकासाची अंगे आहेत. ही व इतर अनेक जीवनविषयक श्रेष्ठ मूल्ये आहेत. या मूल्यांचा परिचय होणे ती प्रत्येकाने आचरण करून आत्मसात करून आपल्या व्यक्तिगत व सामाजिक जीवनात आचरणात आणणे, प्रत्यक्षात आणणे या योगे खऱ्या अर्थाने मानवी जीवन परिपूर्ण होण्यास मदत होईल. आणि यासाठी शिक्षण हेच एक प्रभावी साधन व माध्यम आहे.*

## १. प्रास्ताविक

शिक्षण मानवी जीवन अधिक प्रगत व उन्नत करण्याची प्रक्रिया आहे. समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन म्हणून शिक्षणाचे महत्व आहे. समाजाच्या सर्व क्षेत्रात अमूलाग्र विकासात्मक बदल घडवून आणण्याचे हे एक सर्वमान्य माध्यम आहे. सामाजिक, औदयोगिक, आधुनिक, शेती व सांस्कृतिक या सर्व क्षेत्रात शिक्षणाने नेत्रदिपक क्रांती

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

केलेली आहे. विविध क्षेत्रातील संशोधक व शिक्षण या दोन साधनांनी हातात हात घालून जगातील सर्व क्षेत्रात विलक्षण परिवर्तन घडवून आणले आहे.

आज 21 व्या शतकात प्रवेश केल्यानंतर मूल्ये, मूल्यसंस्कार आणि मूल्यांचे आचरण यांची विशेष गरज भासू लागली आहे. आपल्या देशातील लोकशाहीच्या यशस्वितेसाठी मूल्याधिष्ठित जीवन पध्दतीची आवश्यकता आहे. वैज्ञानिक शोध व विविध क्षेत्रातील नेत्रदीपक प्रगती हे विकसनशील भारतीय समाजाचे मूलाधार आहेत. मूल्यशिक्षणाच्या सुयोग्य संस्कारातून वैज्ञानिक प्रगतीची फळे सामान्य माणसापर्यंत प्रत्येकाला चाखायला मिळतील.

Indian Society of Applied Behavioral Science या संघटनेने मुलांची सत्र परीक्षा घेतली ते म्हणतात की, स्वत:च्या भावना ओळखा, कोणत्या ही घटनेकडे बघताना मेंदूने पहा पण मेंदूने पाहताना त्याकडे हदयानेही पण बघा. भावना हृदयात उत्पन्न होतात. 20 टक्के बुध्दिमत्तेला महत्व आहे तर 80 टक्के भावनांना महत्व आहे. यासाठी नैतिक मूल्ये विकास होणे गरजेचा आहे.

**२. संशोधन समस्येचे विधान**

अहमदनगर जिल्हयातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील मराठी माध्यमाच्या इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांमधील नैतिक मूल्ये, व्यक्तिमत्व आणि शैक्षणिक संपादन यांमधील सहसंबंधाचा अभ्यास.

**३. संशोधनाची गरज व महत्व**

सर्व जगाने आता माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाच्या युगात प्रवेश केला आहे. जगातील बहुतेक सर्व राष्ट्र स्वतंत्र झाली आहेत. काही अपवाद वगळता सर्व देशांनी राज्यकारभारासाठी लोकशाही शासनव्यवस्था स्विकारली आहे. राष्ट्राची ध्येय धोरणे ठरविण्यात सामान्य जनतेच्या प्रतिनिधींचा सहभाग आहे. त्यात सामान्य जनतेच्या प्राथमिक गरजा पूर्ण करणे व आशा, आकांक्षा यांचे प्रतिबींब दिसत आहे. मानवाच्या भौतिक उन्नतीचे व्यक्तिगत व सार्वजनिक आणि सामाजिक परिवर्तनाचे साधन म्हणून शिक्षणाला सन्माननीय बहुमानाचे स्थान प्राप्त झाले आहे. वैज्ञानिक शोधांनी तर सर्व जगाचा चेहरा मोहराच बदलला आहे. कृषी, औदयोगिकीकरण, दळणवळण,

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

संदेशवहन, संगणकीकरण, अवकाश संशोधन इ. क्षेत्रात मानवाने नेत्रदिपक प्रगती केली आहे.

४. **कार्यात्मक व्याख्या**

- **नैतिक मूल्य**

**कार्यात्मक व्याख्या**

नैतिक मूल्य म्हणजे प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यामध्ये खोटारडेपणा, अप्रामाणिकपणा,चोरी व फसवेगिरी या घटकांचे प्रमाण कमी असणे हे होय.

सदर संशोधनात नैतिक मूल्य म्हणजे इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी ए.एस गुप्ता व ए. के.सिंग यांनी प्रमाणित केलेल्या नैतिक मूल्य असलेल्या प्रमाणित चाचणीत मिळालेले प्राप्तांक होय.

- **व्यक्तिमत्व**

सदर संशोधनात व्यक्तिमत्व म्हणजे इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी पॉटर आणि कॅटल यांनी विकसीत केलेल्या व्यक्तिमत्व चाचणीत प्राप्त केलेले प्राप्तांक.

- **शैक्षणिक संपादन**

प्रस्तुत संशोधनात शैक्षणिक संपादन म्हणजे अहमदनगर जिल्हयातील सात तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांतील इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी वार्षिक परिक्षेतील मिळवीलेले सरासरी प्राप्तांक होय.

५. **संशोधनाची उद्‌दिष्टे**

1. नैतिक मूल्य, व्यक्तिमत्व आणि शैक्षणिक संपादन ही चले मोजणे.
2. नैतिक मूल्य, व्यक्तिमत्व व शैक्षणिक संपादन यांमधील सहसंबंध निश्चित करणे.
3. नैतिक मूल्य, व्यक्तिमत्व आणि शैक्षणिक संपादन यांचे सहसंबंधात्मक विश्लेषण करणे.

६. **संशोधन प्रश्न**

1. विद्यार्थ्यांमधील नैतिक मूल्य व व्यक्तिमत्व यामध्ये सहसंबंध आहे का? असल्यास किती प्रमाणात?

Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

2. विद्यार्थ्यांमधील व्यक्तिमत्व व शैक्षणिक संपादन यामध्ये सहसंबंध आहे का? असल्यास किती प्रमाणात?
3. विद्यार्थ्यांमधील नैतिक मूल्य व शैक्षणिक संपादन यामध्ये सहसंबंध आहे का? असल्यास किती प्रमाणात?

**७. संशोधनाची गृहीतके**

1. नैतिक मूल्य, व्यक्तिमत्व आणि शैक्षणिक संपादन ही चले मोजता येतात. (sapkal, 2008)
2. प्रत्येक विद्यार्थ्यांचे नैतिक मूल्य, व्यक्तिमत्व आणि शैक्षणिक संपादन वेगवेगळया प्रकारचे असते. (Sapkal, 2008)
3. नैतिक मूल्य, व्यक्तिमत्व आणि शैक्षणिक संपादन यामधील सहसंबंध काढता येतो. (ग्रोव्हर, 2008)

**८.संशोधनाची व्याप्ती, परिमर्यादा व मर्यादा**

**संशोधनाची व्याप्ती**

1. सदरचे संशोधन प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांशी संबंधित आहे.
2. सदर संशोधन सर्व स्तरावरील विद्यार्थी, शिक्षक व पालकांसाठी उपयुक्त आहे.
3. सदर संशोधनामध्ये इयत्ता सातवीच्या मराठी माध्यमाच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या नैतिक मूल्ये, व्यक्तिमत्व व शैक्षणिक संपादन यांमधील सहसंबंधावर अभ्यास करण्यात आला आहे.

**संशोधनाची मर्यादा**

1. प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष विद्यार्थ्यांनी दिलेल्या प्रतिसादावर अवलंबून आहेत.

**संशोधनाची परिमर्यादा**

1. प्रस्तुत संशोधन हे अहमदनगर जिल्हयातील सात तालूक्यातील मराठी माध्यमाच्या प्राथामिक शाळांपुरतेच मर्यादित आहे.
2. प्रस्तुत संशोधन हे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांपुरतेच मर्यादित आहे.

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

3. प्रस्तुत संशोधनामध्ये नैतिक मूल्यांच्या चार घटकांचा (खोटारडेपणा, अप्रामाणिकपणा, चोरी व फसवेगिरी) अभ्यास केला आहे.
4. प्रस्तुत संशोधनामध्ये व्यक्तिमत्वाच्या चार घटकांचा (विश्वास, सामाजिकता, मानसिक प्रक्रिया व आत्मसमाधान) अभ्यास केला आहे.
5. सन 2014-15 या कालावधितील विद्यार्थ्यांना वार्षिक परिक्षेत मिळालेल्या गुणांचा विचार शैक्षणिक संपादन म्हणून केला आहे.

**९.संबंधित साहित्याचा आढावा**

**राव, एस.एन., (1993), व्यक्तिमत्वाची काही लक्षणे आणि शैक्षणिक समायोजनाशी संबंधित विद्यार्थी संपादनाचा अभ्यास.**

संशोधनासाठी शैक्षणिक समायोजन शोधिका, श्री व्यंकटेश्वर विद्यापीठ श्रेणी आणि विद्यार्थ्यांची मते आजमाविण्यासाठी संशोधकाने विकसित केलेली शोधिका अशी तीन साधने वापरण्यात आली.या संशोधनात विचारात घेतलेली व्यक्तिमत्वाची काही लक्षणे आणि शैक्षणिक समायोजन यात सार्थ सहसंबंध असल्याचे दिसते. सदर संशोधनासाठी वापरण्यात आलेली साधने शैक्षणिक संपादनाच्या निकषावर केलेले विद्यार्थी गट आणि वापरलेली संख्याशास्त्रीय परिमाणे या बाबी प्रस्तुत संशोधिकेला उद्बोधक आहेत. या संशोधनाचे निष्कर्ष विशेषता मानसिक क्षमता व विद्यार्थ्यांचा शैक्षणिक संपादनाचा स्तर आणि व्यक्तिमत्वाची लक्षणे या घटकांमध्ये सार्थ सहसंबंध नसल्याचे आढळते. त्या दृष्टीने आढावा घेतलेल्या संशोधनाचे निष्कर्ष व संशोधक करत असलेल्या संशोधनाचे निष्कर्ष यामधील तफावत बघण्यासाठी मार्गदर्शक आहेत. माहिती संकलनाची साधने यासाठी व्यक्तिमत्व व शैक्षणिक संपादन या घटकांसाठी मार्गदर्शक आहेत.

**सिद्दिकी, बी.बी.(1979) शैक्षणिक यशावर शै़क्षणिक संपादनासाठी प्रेरणा आणि व्यक्तिमत्वाचा प्रभाव.** सदर संशोधनाचा संशोधन साहित्य म्हणून अभ्यास करताना संशोधकाने बुध्दिमत्ता, शैक्षणिक संपादन, व्यक्तिमत्व यातील सहसंबंधांचा अभ्यास करणे तसेच ग्रामीण, शहरी व परदेशी विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व, एकूण शैक्षणिक संपादन आणि प्रेरणा यातील भेदांचा अभ्यास करणे. व्यक्तिमत्व आणि एकूण शैक्षणिक संपादन यातील संबंधाचा अभ्यास करणे. यासाठी अहमदाबाद शहरातील

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

विविध महाविद्यालयातील 450 विद्यार्थ्यांची निवड सुगम यादृश्चिक पध्दतीने करण्यात आली असून थिमॉटिक अपरसेप्शन टेस्ट, मुखर्जीची संपादन प्रेरण द्विवैकल्पिक कसोटी, विद्यार्थ्यांचे महाविद्यालयीन परिक्षेतील गुण, आयसेकची व्यक्तिमत्व शोधिका आणि प्रगमन शील कसोटया या साधनाचा वापर सामग्री संकलनासाठी आणि सामग्री विश्लेषणासाठी वारंवारिता वितरण, एफ परीक्षिका आणि काय स्कवेअर टेस्टचा वापर करण्यात आला. निष्कर्षांनुसार बुध्दिमत्ता, शैक्षणिक संपादन आणि व्यक्तिमत्व या घटकांत अन्यन्य संबंध असल्याचे आढळले. व्यक्तिमत्व आणि शैक्षणिक संपादनासाठी प्रेरण यात परस्पर व धन सहसंबंध असल्याचे सिध्द झाले आहे. हे निष्कर्ष संशोधिकेला उपयुक्त ठरणार आहे. तसेच सुगम यादृच्छिक पध्दतीचा वापर कसा करावा याविषयी माहिती आढावा घेतलेल्या संशोधनातून झाला आहे.

आहे. समस्या निराकणासाठी मुलभूत संशोधनाद्वारे विकसित झालेल्या उपपत्ती रूपांतरीत करण्याकडे उपयोजित संशोधन लक्ष केंद्रित करते.

उपयोजित संशोधन हे व्यवहाराभिमूख असते. यात वास्तव परिस्थितीतुन समस्या निर्माण होते. स्थानिक परिस्थितीतील एखादया व्यावहारिक अडचणींची उकल केली जाते. ते प्रत्यक्ष सामाजिक जीवनातील काय? कसे? व का? या प्रश्नांची उत्तरे देते. नवीन परिस्थितीत योगदान करते आणि संबोध स्पष्टीकरणासाठी सहाय्य करते. शास्त्रीय अभ्यासात ज्ञानाची भर घालणे हे ध्येय दुय्यम असते. या संशोधनाचा दैनंदिन शैक्षणिक पध्दतीवर परिणाम होतो.

Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

१०. **संशोधन पद्धती**

| **टक्र** | **उदिदष्टये** | **संशोधन पध्दती** | **नमुना** | **माहिती संकलनाचे साधन** | **माहिती विश्लेषणाचे साधन** |
|---|---|---|---|---|---|
| १. | 4. नैतिक मूल्य, व्यक्तिमत्व आणि शैक्षणिक संपादन ही चले मोजणे. | सर्वेक्षण पध्दती | इयत्ता 7 वीच्या वर्गातील 489 विद्यार्थी संख्या होय. | प्रश्नावली | **मध्यमान**<br>**प्रमाण विचलन**<br>**पिअरसन सहसंबंध गुणांक** |
| | नैतिक मूल्य, व्यक्तिमत्व व शैक्षणिक संपादन यांमधील सहसंबंध निश्चित करणे. | प्रायोगिक पध्दती | | प्रमाणित चाचणी | |
| | नैतिक मूल्य, व्यक्तिमत्व आणि शैक्षणिक संपादन यांचे सहसंबंधात्मक विश्लेषण करणे. | | | | |

११. **संशोधनाचे प्रमुख निष्कर्ष**

1. अहमदनगर जिल्हयातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांचे नैतिक मूल्ये हे चांगल्या स्वरुपाचे आहे
2. अहमदनगर जिल्हयातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्याचे व्यक्तिमत्व हे चांगल्या स्वरुपाचे आहे.

३. अहमदनगर जिल्हयातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्याचे नैतिक मूल्ये व व्यक्तिमत्व यांमधील सहसंबंध धन स्वरुपाचा असून तो चांगल्या प्रतिचा आहे.

Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

४. अहमदनगर जिल्हयातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्याचे नैतिक मूल्ये व शैक्षणिक संपादन यांमधील सहसंबंध धन स्वरुपाचा असून तो मध्यम प्रतिचा आहे.

**१२.शिफारशी**

1. नैतिक मूल्ये व शैक्षणिक संपादन यांमध्ये सहसंबंध असल्याने विदयार्थ्यांच्या नैतिक मूल्यांमध्ये सुधार होण्यासाठी शिक्षकांना नैतिक मूल्य या घटकांविषयी मार्गदर्शन करावे. (उ.क्र. ४ निष्कर्ष १ नुसार)
2. व्यक्तिमत्व व शैक्षणिक संपादन यामध्ये सहसंबंध असल्याने विदयार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाकडे शिक्षकांनी लक्ष दयावे. (उ.क्र. ३ निष्कर्ष १ नुसार)
3. नैतिक मूल्ये व व्यक्तिमत्व यामध्ये सहसंबंध असल्याने विदयार्थ्यांच्या नैतिक मूल्यांकडे शिक्षकांनी लक्ष दयावे. (उ.क्र. २ निष्कर्ष १ नुसार)
4. विदयार्थ्यांचे नैतिक मूल्ये वाढविण्यासाठी व सुधारण्यासाठी प्राथमिक स्तरावर नैतिक मूल्ये या घटकाचा समावेश करावा.

**१३.समारोप**

संशोधकाला दैनंदिन जीवनात अध्ययन अध्यापनाचे काम करताना अनेक अडचणी येतात यातील एक समस्येची निवड करून सदरच्या संशोधनात संशोधकाने संशोधन समस्येची निश्चिती करून त्याला अनुरूप उद्दिष्टांची मांडणी केली. ठरविलेल्या उद्दिष्टांना अनुसरून संशोधनाची गरज व महत्वाची मांडणी करण्यात आली आहे. संशोधन समस्येत आलेल्या महत्वाच्या शब्दांच्या संकल्पनात्मक आणि कार्यात्मक व्याख्या मांडून संशोधनातील महत्वाच्या चलांविषयी माहिती मांडण्यात आली आहे. संशोधकाने निवडलेल्या समस्येशी निगडीत अशी काही संशोधने यापूर्वी झाली आहेत का?. यासाठी संशोधनाशी संबंधित संशोधन साहित्याचा आढावा पुढील प्रकरणामध्ये मांडण्यात आला आहे.

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

## संदर्भ ग्रंथ सूची

***David S. Zern, (1997).*** *A Longitudinal Study of Adolescents' Attitudes about Assistance in the Development of Moral Values.*

***Laura Parks-Leduc, Gilad Feldman, and Anat Bardi, (2015).*** *Personality Traits and Personal Values: A Meta Analysis.*

***राव, एस.एन., (१९९३),*** *व्यक्तिमत्वाची काही लक्षणे आणि शैक्षणिक समायोजनाशी संबंधित विद्यार्थी संपादनाचा अभ्यास.*

***सिददीकी, बी.बी.(१९७९)*** *शैक्षणिक यशावर शैक्षणिक संपादनासाठी प्रेरणा आणि व्यक्तिमत्वाचा प्रभाव.*

*Copyright © 2024, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*